## अटी व शर्ती (बीएएमएस अर्हताधारक)

१. गोंदिया या जिल्हयातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य संस्थामध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट अ या संवर्गातील वैद्यकीय या रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिण्याच्या कालावधीकरिता किंवा सदर पदावर एम.बी.बी.एस. अर्हताधारक नियमित वैद्यकीय अधिकारी नियुक्तीने /बदलीने उपलब्ध होईल त्या दिनांकापर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच असल्याने वार्षीक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

२. सदर तात्पुरती नियुक्ती देतांना बीएएमएस पदवी धारण केल्यानंतर पदवीत्तर पदवी प्राप्त केलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

३. सेवा प्रवेश नियमातील वयोमर्यादेनुसार व शासनाने वेळोवेळी वयोमर्यादेच्या अनुषंगाने घेतलेल्या निर्णयानुसार तात्पुरती वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती देण्यात येईल.

४. वय दि. ३१ मे २०१७ रोजी ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे - मागास वर्गीय उमेदवारांच्या बाबतीत शिथीलक्षम

५. शासकीय वैद्यकीय सेवेत स्थायी / अस्थायी / बंधपत्रीत स्वरुपात कार्यरत असणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयो मर्यादा जास्तीत जास्त ५ वर्षा पर्यंत शिथील करण्यात येईल

६. शासन निर्णय सार्वजनीक आरोग्य विभाग क्र.मवैअ-२०११/प्र.क्र.७४५/११/सेवा३ दि ३ आक्टोंबर २०१३ या मधी नमुद विशेष तज्ञ शाखेतील असाधारण किंवा अति विशेतज्ञ शैक्षणिक अर्हता धारक केलेल्या उमेवाराच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा जास्तीत जास्त १० वर्षा पर्यंत शिथील करण्यात येईल.

७. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यापासून ७ (सात) दिवसात पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होणे आवश्यक राहील

८. तात्पुरती नियुक्ती दिलेल्या वैद्यकीय अधिका-यांना आदिवासी व दुर्गम भागाकरिता रु.४५०००/- व ईतर भागाकरिता दरमहा ४०,०००/- एकत्रीत ठोक रक्कम अदा करण्यात येईल.

९. सदर वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने नियीमत वैद्यकीय अधिका-यांसारखे निवृत्ती वेतन विमा योजना.भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही सेवाविषयक ईतर लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत.

१०. सदर नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात असल्याने सदर पदावर त्यांचा कोणताही हक्क राहणार नाही.

११. तात्परुती नियुक्ती दिलेल्या उमेदवारांची भविष्यात वैद्यकीय अधिकारी गट-अ या पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार विहीत मार्गाने नियीमत पदावर नियुक्ती झाल्यास सदरची तात्पुरती सेवा त्यांच्या नियीमत सेवेस जोडून दिली जाणार नाही.

१२. सदर वैद्यकीय अधिकारी यांनी सेवेत असतांना गैरवर्तण / गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यास सेवा तात्काळ समाप्त करण्यात येतील.व पुन्हा नियुक्ती देता येणार नाही.

१३. सदर वैद्यकीय अधिका-यांना महाराष्ट्र नागरी सेवा(वर्तणूक) नियम १९७९ मधील तरतुदी लागू राहतील.

१४. सदर वैद्यकीय अधिकारी यांना सेवा काळात सेवामुक्त व्हायचे असल्यास १ महिण्याचा नोटीस किंवा १ महिण्याचे वेतन भरुन कार्यमुक्त होता येईल.

१५. सदर तात्पुरत्या वेद्यकीय अधिका-यांची पुन्हा नेमणूक करायची असल्यास १ महिण्याचा खंड देण्यात येईल

१६. सदर वैद्यकीय अधिकारी यांनी या आदेशाद्वारे नियुक्ती स्विकारल्यास व दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू झाल्यास वरिल अटी व शर्ती आपणांस मान्य आहेत असे गृहीत धरण्यात येईल.

१७. मा.सर्वोच्च न्यायालयाने अपील क्रमांक ७७४४/१९९७ या प्रकरणी दिनांक १८/२/२००३ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार मुळ नियुक्ती विहीत मार्गाने केलेली असल्याशिवाय सेवा नियमित करता येणार नाही. तसेच लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदावर तात्पुरत्या/अस्थायी स्वरुपात नियुक्ती केलेला कोणताही कर्मचारी त्या पदावर कितीही वर्ष सेवेत राहीला तरी कायम करण्याच्या हक्क सांगू शकत नाही. सदरील नियुक्त्या या अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या/अस्थायी नियुक्ती विहीत वेळेनंतर संपुष्टात येईल तसेच अशा कर्मचा-यांनी त्यांना नियमित सामावून घेण्याची मागणी केल्यास ती मान्य करता येणार नाही.